# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/०६/२०२६ (बुधवार )

---

## नागपुर ग्रामीण पोलीसांनी बुंडु, जिल्हा रांची, राज्य झारखंड येथुन २ किलो २८५ ग्रॅम अंमली पदार्थ अफु (अफिम) सह इतर साहीत्य असा एकुण १३ लाख ५ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

दिनांक २०/०५/२०२६ रोजी उमरेड येथे दाखल अंमली पदार्थ अफु (अफिम) तस्करीच्या गुन्हयात सखोल तपास करीत नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने आंतरराज्यीय अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्या आरोपींच्या टोळीला निष्पन्न करून दिनांक २५/०५/२०२६ रोजी झारखंड राज्यातील सिमडेगा येथे छापा टाकुन अंमली पदार्थ पुरवठा करणारा आरोपी हॉटेल व्यवसायीक मनिषकुमार अंबिकाप्रसाद, वय ४६ वर्षे ,रा. भंडारटोली, करपनादास ता. ठेठईटांगल, जि. सिमडेगा, राज्य झारखंड याला सदर गुन्हयात अटक केली.३३.७६७ किलोग्रॅम अंमली पदार्थ अफु (अफिम) आणि २३,३५,०००/—रूपये रोख रक्कम सह इतर साहीत्य असा एकुण १,९२,३६,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयाचे विशेष तपास पथक यांनी अटक अरोपी मनिषकुमार अंबिकाप्रसाद याला सखोल तपास करून अंमली पदार्थ पुरवठादार आरोपी विमलसिंह मुंडा, रा.जोजोडीह टोला, सरमली जि. खुंटी, राज्य झारखंड याला निष्पन्न केले. परंतु आरोपी मिळुन न आल्याने त्याच्या रांची जिल्हयातील बुंडु शहरातील मॅनेजर तलाव परीसरात राहणाऱ्या त्याच्या कुटुंबाची माहीती काढण्यात आली. पोलीसांचा सुगावा लागल्याने आरोपी पळुन गेले. नमुद तपास पथकाने

पोलीस स्टेशन बुंडु यांच्या सहकार्याने बुंडु येथील आरोपीच्या घराची झडती घेतली असता २ किलो २८५ ग्रॅम अफू/अफिम (**Opium**) अंमली पदार्थ मिळुन आला.

दिनांक ०३/०६/२०२६ रोजी पोलीसांनी आरोपीच्या घर झडतीत एकुण २ किलो २८५ ग्रॅम वजनाचा अफू/अफिम (**Opium**) अंमली पदार्थ किंमती ११,४२,५००/— रुपये, १ लॅपटॉप , २ मोबाईल , इलेक्ट्रॉनिक वजनकाटा असा एकूण १३,०५,५००/— रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.





## पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) च्या गुन्हयातील अवैध रेती तस्कर टोळीतील पाहीजे ६ आरोपींना अटक, ४ दिवस पोलीस कोठडी मंजुर,भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत पोलीस स्टेशन भिवापुर येथे **बनावट परवाना तयार करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करून शासनाचा महसुल बडवुन फसवणुक करणारा** टोळी प्रमुख आणि सदस्य अशा एकुण ९ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे **टोळीप्रमुख नामे १) मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन,वय ४० वर्ष,रा. रोशनबाग खरबी चौक,नागपूर व टोळी सदस्य यांच्यावर** कलम ३०३ (२), ३१८(४),३३६(३),४९,३(५) भा न्या सं सहकलम ४८ (७) ४८ (८) महा जमीन महसुल संहित १९६६ सह ४, २१ खान व खनीज अधीनियम १९५७ सह कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रती अधी १९८४ सह १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम सह कलम ३ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९

(MCOCA) अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयात पोलीसांनी टोळीप्रमुख नामे १) मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन,वय ४० वर्ष,रा. रोशनबाग खरबी चौक,नागपूर आणि टोळी सदस्य २) कैसर अली रियाजुददीन अली, वय ४७ वर्ष,रा. गरीब नवाज चौक, खरबी, नागपूर ३) सुरज दिलीप गभने, वय २७ वर्षे, रा. गुडेगाव, पो.सावरला, ता.पवनी जि.भंडारा, ४) दिनेश मधूकर काकडे, रा. डोंगरगाव ता. कुही जि. नागपूर ,आरोपी क्रं ५) शैलेंद्र कवडु वैद्य, वय ३५ वर्षे, रा. पाचगाव वार्ड क्रमांक २ वोडाफोन टॉवरच्या बाजूला तालुका उमरेड जिल्हा नागपूर आणि ६) अमोल देवराव पाटील, वय ३६ वर्षे, रा पाचगाव, ता. उमरेड जि. नागपूर यांना यापुर्वी अटक केलेले आहे. **सदर गुन्हयात नागपुर ग्रामीण पोलीसांनी अधिक तपास करून सदर गुन्हयात या ९ आरोपी व्यतिरीक्त अधिक आरोपी असल्याचे निषन्न केले. सदर गुन्हयातील आरोपी हे Whats app ग्रुप द्वारे पोलीस विभाग आणि महसुल विभागांच्या वाहनांचे लोकेशन एकमेकांना पाठवुन संघटितरित्या गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले.**

**दिनांक ०२/०६/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात पाहीजे आरोपी १) साऊद आरिफ खॉं पठाण, वय ३० वर्ष रा. वर्धमान नगर, प्लॉट क्र १/ ए नागपूर २) रवी पूरुषोत्तम तायडे, वय ४२ वर्ष, रा. प्लॉट न १५, माळगी नगर, नागपूर ३) विकास सुनिल हजारे, वय २७ वर्ष ,रा पाचगाव, ता उमरेड, जि. नागपूर ४) प्रतीक बादल भावे, वय २६ वर्ष, रा. कावरापेठ, उमरेड ५) शुभम गुणवंता भोयर, वय २९ वर्ष, रा. खापरी राजा, ता उमरेड, जि. नागपूर आणि ६) सोपान उत्तम राउत, वय ३६ वर्ष, रा. कोलार, ता. जि. नागपूर यांना ताब्यात घेवुन अटक केले आहे. नमुद आरोपींना दिनांक ०६/०६/२०२६ रोजी पर्यंत एकुण ४ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**




साऊद आरिफ खाँ पठाण



रवी पूरुषोत्तम तायडे



विकास सुनिल हजारे



प्रतीक बादल भावे



शुभम गुणवंता भोयर



सोपान उत्तम राउत,

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक ०२/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**आरोपी १) संदीप कमल चौधरी, वय १९ वर्ष, रा. पाचपावली, वार्से नगर, नागपुर २) मोहित गोपाल विश्वकर्मा, वय २० वर्ष, रा. सितासावंगी, चिखला माईन, जि. भंडारा हे मौजा मोरफाटा दर्गा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०२ गुन्हे नोंद.

दिनांक ०२/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन कुही, उमरेड यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ७३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी नामे विरेंद्र ज्ञानेश्वर सोनकुसरे, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, मांढळ, ता. कुही, जि. नागपुर हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने याचेवर** महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये **०१ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी नामे मासुम अनवर अली, वय ४२ वर्ष, रा. टिचर कॉलनी, उमरेड हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने याचेवर** महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये **०१ गुन्हा नोंद.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक ०२/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू असा एकुण २८१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) सतिष शांताराम रेवतकर, वय ४२ वर्ष, रा. भिष्णुर, ता. नरखेड २) अनिल साहेबराव खडसे, वय ४९ वर्ष, रा. भिष्णुर, ता. नरखेड याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे रामचंद्र किस्तीया गड्डमवार, वय ५५ वर्ष, रा. रेल्वे स्टेशन जवळ, वार्ड क्र. १०, बुटीबोरी याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे विजय देवाजी जुमळे, वय २७ वर्ष, रा. धानला, ता. मौदा याचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ५९४० मिली देशी दारू असा एकुण २८१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**